महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८३

# मुंबई राज्य टंचाई निवारण निधि अधिनियम, १९५८

(दिनांक १३ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारित)

**Bombay Act No. LXXXIII of 1958**

# The Bombay State Scarcity Relief Fund Act, 1958

*(As modified upto 13th November, 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर यांनी मुद्रित केले आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी प्रकाशित केले.

**2006**

[किंमत : रु. ५-००]

# मुंबई राज्य टंचाई निवारण निधि अधिनियम, १९५८

## अनुक्रमणिका

उद्देशिका


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव व व्याप्ती. | १ |
| २. | व्याख्या. | १ |
| ३. | महाराष्ट्र राज्य टंचाई निवारण निधि स्थापन करणे व ती ठेवणे. | २ |
| ४. | सन १९३६ चा मुंबई अधिनियम १९, सन १९३७ चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम ३ आणि सन १९५१ चा सौराष्ट्र अधिनियम १४ अन्वये धारण केलेल्या प्रतिभूतींचे हस्तांतरण. | २ |
| ४क. | १ मे, १९६० रोजी अथवा नंतर प्रतिभूती, इत्यादींचे हस्तांतरण. | २ |
| ५. | ज्या प्रयोजनासाठी निधीचा उपयोग करता येईल ती प्रयोजने. | ३ |
| ६. | तात्काळ उपयोग करण्यासाठी आवश्यक नसणाऱ्या रकमा गुंतवणे आणि पुन्हा गुंतवणे. | ३ |
| ७. | लेखे आणि निधीतील तूट भरून काढणे. | ३ |
| ८. | निरसन आणि व्यावृत्ती. | ४ |

# सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८३[1]

**[मुंबई राज्य टंचाई निवारण निधि अधिनियम, १९५८]**

[९ ऑक्टोबर, १९५८]

या अधिनियमात, महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याद्वारे अनुकूलन व रूपभेद करण्यात आले आहेत ; आणि

सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम ४० याद्वारे त्यात सुधारणा करण्यात आल्या आहेत.

[2][टंचाईच्या] परिस्थितीच्या संबंधात प्रतिबंधक व सुधारात्मक उपाय करण्यासाठी होणारा किंवा भीषण अवर्षणामुळे, पुरामुळे किंवा राज्यातील अन्य नैसर्गिक आपत्तींमुळे उद्‌भवणाऱ्या हालअपेष्टा दूर करण्यासाठी होणारा खर्च भागविण्याकरिता मुंबई राज्यात [3][टंचाई निवारण निधी] स्थापन करण्यासाठी व तो ठेवण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.

**ज्याअर्थी,** हस्तांतरित प्रदेश वगळून, पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात आणि त्या राज्याच्या विदर्भ प्रदेशात आणि सौराष्ट्र क्षेत्रात अनुक्रमे मुंबई दुष्काळ निवारण निधि अधिनियम, १९३६, मध्य प्रांत आणि वऱ्हाड दुष्काळ निवारण निधि, अधिनियम, १९३७ आणि सौराष्ट्र दुष्काळ निवारण निधि अधिनियम, १९५१ हे अंमलात आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** राज्याच्या हैदराबाद आणि कच्छ क्षेत्रांत कोणताही तत्सम कायदा अंमलात नाही ;

**आणि ज्याअर्थी,** [2][टंचाईच्या] परिस्थितीच्या संबंधात, प्रतिबंधक व सुधारत्मक उपाययोजना करण्यासाठी होणारा किंवा भीषण अवर्षणामुळे, पुरामुळे किंवा राज्याच्या कोणत्याही भागातील अन्य नैसर्गिक आपत्तीमुळे उद्‌भवणाऱ्या हालअपेष्टा दूर करण्यासाठी होणारा खर्च भागविण्याकरिता [4][महाराष्ट्र राज्य टंचाई निवारण निधि] या नावाचा एक समाईक निधि स्थापन करण्यासाठी व तो ठेवण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :--

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई राज्य [5][टंचाई] निवारण निधि अधिनियम, १९५८ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, व व्याप्ती.

(२) तो, सबंध [6][महाराष्ट्र राज्यास] लागू असेल.

व्याख्या. **२.** या अधिनियमात "निधी" याचा अर्थ, कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेला आणि ठेवलेला [7][महाराष्ट्र] राज्य [5][टंचाई] निवारण निधी, असा आहे.

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **मुंबई शासन राजपत्र,** १९५८, भाग पाच, पृष्ठे ४१४ व ४१५ (इं) पहा.

[2] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम ४०, कलम ३ (१), अनुसूचीन्वये "दुष्काळ किंवा तीव्र टंचाईची" या मजकुराऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम ४०, कलम ३ (१) अनुसूचीन्वये "दुष्काळ निवारण निधी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम ४०, कलम ३ (१), अनुसूचीन्वये "मुंबई राज्य दुष्काळ निवारण निधी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम ४०, याचे कलम ३ (१), अनुसूचीन्वये "दुष्काळ" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[6] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० या अन्वये "मुंबई राज्यास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] वरील आदेशान्वये, "मुंबई" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[महाराष्ट्र] राज्य [टंचाई] निवारण निधी स्थापन करणे व तो ठेवणे.

३. महाराष्ट्र राज्यात आणि राज्यासाठी राज्य शासन "[1][महाराष्ट्र] राज्य [2][टंचाई] निवारण निधी" नावाचा एक निधी स्थापन करील आणि तो ठेवील, हा निधी पुढील गोष्टींचा मिळून बनलेला असेल :--

(१) [3][कलम ४क] मध्ये नमूद केलेल्या (रोख शिल्लक रकमा, कोणत्याही असल्यास, त्या धरून) प्रतिभूती ;

(२) अशा प्रतिभूतींवर, वेळोवेळी, उपार्जित होईल असे व्याज ;

(३) कलम ७, पोट-कलम (२) अन्वये किंवा अन्यथा राज्य शासन वेळोवेळी निधीस अंशदान म्हणून देईल अशा इतर रकमा, आणि

(४) निधीच्या खाती जमा असलेल्या रकमा ज्या प्रतिभूतींमध्ये कलम ६ अन्वयें गुंतविता किंवा पुन्हा गुंतविता येतात त्या प्रतिभूतींवर वेळोवेळी उपार्जित होईल असे व्याज.

सन १९३६ चा मुंबई अधिनियम १९, सन १९३७ चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम ३ आणि, सन १९५१ चा सौराष्ट्र अधिनियम १४ अन्वये धारण केलेल्या प्रतिभूतींचे हस्तांतरण.

४. मुंबई दुष्काळ निवारण निधि अधिनियम, १९३६ आणि मध्यप्रांत व वऱ्हाड दुष्काळ निवारण निधि अधिनियम, १९३७ या अन्वये स्थापन केलेल्या दुष्काळ निवारण निधीमधील प्रतिभूतीपैकी ज्या प्रतिभूती राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ याच्या कलम ८० अन्वये मुंबई राज्याकडे येतील त्या प्रतिभूती (रोख शिल्लक रकमा, कोणत्याही असल्यास, त्या धरून) आणि सौराष्ट्र दुष्काळ निवारण निधि अधिनियम, १९५१ या अन्वयें स्थापन केलेल्या दुष्काळ निवारण निधीतील सर्व प्रतिभूती (रोख शिल्लक रकमा, कोणत्याही असल्यास, त्या धरून) ह्या या अधिनियमाच्या प्रारंभानंतर [4][ या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या निधीत] हस्तांतरित केल्या आहेत आणि त्या त्या निधीचा भाग आहेत असे समजले जाईल आणि त्या मुंबई शासनाच्या दुष्काळ विभागाच्या सचिवाच्या किंवा राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा इतर अधिकाऱ्यांच्या नावाने धारण केल्या जातील किंवा त्यांच्या नावावर हस्तांतरित केल्या जातील.

१ मे, १९६० रोजी अथवा नंतर प्रतिभूती, इत्यादींचे हस्तांतरण.

[5][**४-क.** कलम ४ मध्ये उल्लेख केलेल्या प्रतिभूतींपैकी मुंबई पुनर्रचना अधिनियम, १९६० याचे कलम ५१, पोट-कलम (२) या अन्वये ठरवण्यात येतील अशा प्रतिभूती, (रोख शिल्लक रकमा, कोणत्याही असल्यास, त्या धरून) महाराष्ट्र शासनाच्या दुष्काळ विभागाच्या सचिवाच्या किंवा राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा इतर अधिकाऱ्यांच्या नावाने धारण केल्या जातील किंवा त्यांच्या नावावर हस्तांतरित केल्या जातील.]

---

[1] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश १९६० द्वारे "मुंबई" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[2] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम ४०, याचे कलम ३ (१) अनुसूची या अन्वये "दुष्काळ" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश १९६० द्वारे "कलम ४" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम ४०, याचे कलम ३ (१) अनुसूची, या अन्वये "या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या दुष्काळ निवारण निधीत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० या अन्वये कलम ४ क समाविष्ट करण्यात आले.

५. [1][महाराष्ट्र राज्या] तील किंवा त्याच्या कोणत्याही भागातील-- ज्या प्रयोजनांसाठी निधीचा उपयोग करता येईल ती प्रयोजने:

(१) [2][टंचाई] च्या परिस्थितीचे निवारण करण्यासाठी ; किंवा

(२) भीषण अवर्षणामुळे, पुरांमुळे किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवणाऱ्या हालअपेष्टा दूर करण्यासाठी, खर्च करावयाचा असेल ते खेरीज करून, निधीची रक्कम खर्च करण्यात येणार नाही :

परंतु, जेव्हा निधीची रक्कम, राज्य शासन या बाबतीत आदेशाद्वारे निर्धारित करील अशा रकमेपेक्षा अधिक होत असेल तेव्हा, राज्य शासनास, [1][महाराष्ट्र राज्यातील] किंवा त्याच्या कोणत्याही भागातील [2][टंचाई] च्या परिस्थितीच्या संबंधात प्रतिबंधक किंवा सुधारात्मक उपाययोजना करण्यासाठी होणारा खर्च भगविण्याच्या कामी ; किंवा जमीन सुधारणा कर्ज अधिनियम, १८८३ या अन्वये किंवा शेतकऱ्यांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १८८४ या अन्वये शेतकऱ्यांना कर्जे देण्यासाठी किंवा सहाय्य देण्याच्या प्रयोजनासाठी ; किंवा अशा कर्जाच्या वसूल न होण्याजोग्या शिल्लक रकमा भागविण्यासाठी त्या अधिक रकमेचा उपयोग करता येईल.

६. कलम ५ मध्ये उल्लेख केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी निधीच्या खाती जमा असलेल्या ज्या रकमांची तात्काळ आवश्यकता नसेल अशा सर्व रकमा, राज्य शासन, वेळोवेळी सार्वजनिक कर्ज अधिनियम, १९४४ याचे कलम २, खंड (२) यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या शासकीय प्रतिभूतींमध्ये किंवा भारतीय विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १८८२ याचे कलम २०, खंड (क) किंवा (ड) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रतिभूतींमध्ये [3][महाराष्ट्र शासना] च्या वित्त विभागाच्या सचिवाच्या किंवा राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा इतर अधिकाऱ्यांच्या नावाने गुंतवील किंवा पुन्हा गुंतवील : तात्काळ उपयोग करण्यासाठी आवश्यक नसणाऱ्या रकमा गुंतवणे आणि पुन्हा गुंतवणे.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी कलम ४ मध्ये नमूद केलेल्या प्रतिभूतींमध्ये ज्या रकमा गुंतवलेल्या असतील त्या रकमा, या कलमात अशा कोणत्याही प्रतिभूतींचा उल्लेख केलेला नसला तरी, जोपर्यंत राज्य शासनाला त्या या कलमान्वये पुन्हा गुंतवणे योग्य वाटत नसेल तोपर्यंत, अशा रीतीने गुंतवल्या असल्याचे चालू ठेवता येईल.

७. (१) प्रत्येक वित्तीय वर्षाच्या शेवटी, अशा वर्षाच्या शेवटच्या दिवशी असलेल्या बाजार भावाने निधीच्या मालकीच्या प्रतिभूतींचे मूल्यांकन करून निधीचे लेखे तयार करण्यात येतील. लेखे आणि निधीतील तूट भरून काढणे.

(२) अशा रीतीने करण्यात आलेल्या लेख्यांवरून जर असे दिसून येईल की, अशा वर्षाच्या शेवटी निधीतील शिल्लक रक्कम ही, [4][या बाबतीत राज्य शासन आदेशाद्वारे निर्धारित करील अशा रकमेने] कमी पडते तेव्हा, ती तूट राज्याच्या एकत्रित निधीतून भरून काढण्यात येईल :

---

[1] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० या अन्वये "मुंबई राज्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम ४०, याचे कलम ३ (१) अनुसूचीच्या अन्वये "दुष्काळ किंवा तीव्र टंचाईची" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० या अन्वये "मुंबई सरकार" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० नुसार "चार कोटी रुपये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, जर अशी तूट [1][या बाबतीत राज्य शासन आदेशाद्वारे निर्धारित करील अशा रकमेहून अधिक होत असेल] तर ती, शेवटचा हप्ता खेरीज करून, प्रत्येक हप्ता [2][अशा रकमेपेक्षा कमी] नसेल अशा वार्षिक हप्त्यांनी भरून काढता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही खर्चाचा भार हा, राज्याच्या एकत्रित निधीवर राहील.

निरसन आणि व्यावृत्ती. ८. मुंबई दुष्काळ निवारण निधि अधिनियम, १९३६ आणि मध्य प्रांत व वऱ्हाड दुष्काळ निवारण निधि अधिनियम, १९३७ हे, *मुंबई राज्यास लागू असताना, आणि सौराष्ट्र दुष्काळ निवारण निधि अधिनियम, १९५१, हे, याद्वारे निरसित करण्यात येत आहेत :

परंतु, अशा निरसनामुळे--

(क) अशा रीतीने निरसित झालेल्या कोणत्याही अधिनियमाच्या पूर्वीच्या प्रवर्तनास ; किंवा

(ख) अशा रीतीने निरसित झालेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमांन्वये संपादित केलेल्या, उपार्जित केलेल्या कोणत्याही अधिकारास, विशेषाधिकारास किंवा पत्करलेल्या बंधनास किंवा दायित्वास ; किंवा

(ग) पूर्वोक्तप्रमाणे अधिकार, विशेषाधिकार, बंधन किंवा दायित्व यांच्या बाबतीत कोणत्याही अन्वेषणास, न्यायालयीन कार्यवाहीस किंवा उपाययोजनेस, बाध पोहचणार नाही आणि जणू काय हा अधिनियम संमत झालाच नाही, असे समजून असे कोणतेही अन्वेषण, न्यायालयीन कार्यवाही किंवा उपाययोजना दाखल करता, चालू ठेवता किंवा अंमलात आणता येईल :

आणखी असे की, अशा रीतीने निरसित केलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, जोपर्यंत या अधिनियमांशी विसंगत नसेल तोपर्यंत, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीन्वये, जणू काही अशी गोष्ट किंवा कारवाई करताना राज्याच्या संबंधित भागात उक्त तरतूद अंमलात होती असे समजून केलेली गोष्ट किंवा केलेली कारवाई आहे, असे समजण्यात येईल आणि ती, या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीने अथवा कोणत्याही कारवाईने तिची जागा घेतल्याशिवाय अथवा घेईपर्यंत त्यानुसार अंमलात असण्याचे चालू राहील.

---

[1] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० नुसार "पंधरा लाख रुपयांवर असेल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० नुसार "पंधरा लाख रुपयांपेक्षा कमी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* "मुंबई राज्य" रुपभेद न होता तसेच राहील [पहा--महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०].

एच ५८-६,०८२ पु.-११-२००६

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.